नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १०५ Issue - 105 | वार सोमवार दि. १ सप्टेंबर २०२५ Blow- Monday Date 1 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## मराठा आरक्षण; कायदा, राज्यघटनेच्या चौकटीतच निर्णय

### पर्यायांची चाचपणी; तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरु, मुख्यमंत्र्यांकडून स्पष्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठा आरक्षणासाठी तीन दिवसांपासून आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तोडगा काढण्यासाठी राज्य सरकारने पर्यायांची चाचपणी सुरू केली आहे. मंत्रिमंडळ उपसमितीने रविवारी दोन वेळा बैठका घेऊन विविध मुद्द्यांवर मंथन केले. मात्र, त्यातून कोणताही तोडगा निघू शकला नाही; परंतु, 'तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू असून, कायदा, राज्यघटनेच्या चौकटीतच निर्णय घेण्यात येईल,' असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी स्पष्ट केले.





आझाद मैदान आणि परिसरात रविवारी सलग तिसऱ्या दिवशी आंदोलकांनी शक्तिप्रदर्शन करून आरक्षणाची मागणी जोरकसपणे मांडली. या पार्श्वभूमीवर शासकीय पातळीवर बैठकांचे सत्र सुरू आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या मुद्द्यावर सरकारची भूमिका मांडली. 'या संदर्भात कायद्याच्या चौकटीतच निर्णय घ्यावा लागणार आहे. न्यायालयाच्या आधीच्या निर्णयांचाही विचार करावा लागेल.

कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन असेच निर्णय घ्या, असे कोणी म्हणत असेल आणि सरकारने त्यांना खूश करण्यासाठी असा निर्णय घेतला तर तो एक दिवसही टिकणार नाही. त्यानंतर मराठा समाजाची फसवणूक झाल्याची भावना तयार होईल. त्यामुळे आम्ही चर्चा करीत आहोत. मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीत विचार-विनिमय सुरू आहे. कायदेशीर सल्लागारांचे मत घेत आहेत. त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करू. लोकशाहीत चर्चेतून तोडगा निघतो. आडमुठ्या भूमिकेने तोडगा निघत नाही,' असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

'माजी न्यायमूर्ती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती आपण तयार केली. त्या समितीमुळेच बऱ्याच नोंदी सापडल्या. अनेकांना प्रमाणपत्रेही मिळाली. शिंदे समितीनेच जरांगे यांना भेटून या बदलासाठी वेळ लागणार असल्याचे सांगितले. पण, आताच द्या, असे त्यांचे म्हणणे आहे. शेवटी चर्चेतून मार्ग काढता येतो. मला कायद्यानुसारच निर्णय घ्यावे लागतात. मी घटनेच्या चौकटीबाहेर जाऊ शकत नाही,' असेही ते म्हणाले. 'मराठा आरक्षणाचा हा प्रश्न राजकीय करण्याचा काहींचा प्रयत्न आहे. सामाजिक प्रश्नात राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करू नये,' असे फडणवीस म्हणाले.

'शिव्या खाणे, लोकांचा उपहास सहन करणे या गोष्टींची मला सवय आहे. त्याचा माझ्यावर काही परिणाम होत नाही. लोक तुम्हाला तुमच्या कर्तृत्वाने लक्षात ठेवतात, तुम्हाला कोणी शिव्या दिल्या यामुळे लक्षात ठेवत नाहीत आणि शिव्या देणाऱ्यांनाही लक्षात ठेवत नाहीत,' असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

सरकारकडे ५८ लाख कुणबी नोंदी आहेत. याच आधारावर मराठा आणि कुणबी एक असल्याचा शासन निर्णय काढावा', असा नवा पर्याय मनोज जरांगे यांनी रविवारी संध्याकाळी सरकारला दिला. सोमवारपासून जलत्यागाचा इशाराही जरांगे यांनी दिला. नेत्यांना आंदोलनस्थळी येण्यापासून रोखू नका, अशी सूचनाही त्यांनी केली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी रविवारी आझाद मैदानात मनोज जरांगे यांची भेट घेतली. या भेटीनंतर परतत असतानाच सुळे यांना आंदोलकांच्या रोषाला सामोरे जावे लागले. आंदोलकांनी सुळे यांना घेराव घालत त्यांची गाडी अडविण्याचाही प्रयत्न केला. त्यामुळे काही वेळ तणाव निर्माण झाला होता

## मनोज जरांगे यांनी सरकारला नवा पर्याय सुचवला; सरसकट नका करू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला मराठा समजाला कुणबी जात प्रमाणपत्र देण्यासाठी आता नवा पर्याय सूचवला आहे. उपसमितीची आज दोन वेळेस बैठक झाली. त्यांच्या म्हणण्यानुसार सुप्रीम कोर्टाच्या निर्णयात सरसकटला प्रोब्लेम आहे. पण असण्याचं कारण नाही. पण त्याला दुसराही पर्याय आहे. ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत. या ५८ लाख नोंदींच्या आधारे जीआर काढा. ज्या मराठ्यांच्या नोंदी सापडल्या नाहीत त्यांची पोटजात उपजात म्हणून आपण आरक्षण द्या. सरसकट शब्द वापरु नका. त्या ५८ लाख नोंदींच्या आधारावर अध्यादेश काढा की, कुणबी ही उपजात आहे. २०१२ च्या कायद्याने ओबीसी आरक्षण मजबुत केलं. तुम्ही त्या कायद्यानुसार या आरक्षणासाठी पात्र ठरत आहात. मराठ्यांच्या ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत. त्यामुळे मराठ्यांची कुणबी ही उपजात घ्या. ज्यांना कुणबी घ्यायचं आहे तो घेईल, ज्यांना नाही घ्यायचं तो घेणार नाही. सरसकट म्हणायची गरज नाही, असा नवा पर्याय मनोज जरांगे यांनी सुचवला.



आम्ही तुमच्या म्हणण्यानुसार, अभ्यासकांसोबत फक्त चर्चा केली. आम्ही कसलेही डॉक्युमेंट्स सरकारला देणार नाहीयत. त्याचं कारण असं, सरकारने १३ महिन्यांपूर्वी डॉक्युमेंट घेतले होते. आता देऊन उपयोग नाही. सरकारने १३ महिन्यांपूर्वी हैदराबात संस्थानकडून डॉक्यूमेंट्स घेतले. आंध्र प्रदेशचे मुख्य सचिव आणि आपल्या राज्याचे मुख्य सचिव यांनी हैदराबाद संस्थानच्या डॉक्युमेंट्सची टेस्टिंग केली. त्या उचलून आणल्या असत्या, इथल्या मागासवर्ग आयोगाला, केंद्राच्या मागासवर्ग आयोगाला, राज्याच्या कॅबिनेटला आणि इथल्या समितीला आणि २०१२ च्या कायद्याला म्हणजे हे पंचसूत्री आहे, ह्याला त्या मान्य झाल्या नसत्या. म्हणून इथल्या मुख्य सचिवांनी तिकडच्या मुख्य सचिवांकडून ॲडजेस्टेड करुन आणायचं होतं ते आणलं नाही. आता आमची चर्चा फक्त एवढ्यासाठी झाली की, काय केलं पाहिजे? सातार आणि हैदराबादच्या गॅझेटियरसाठी मी एक मिनिटही वेळ द्यायला तयार नाही, अशी भूमिका मनोज जरांगे यांनी मांडली.

सातारा संस्थानचं गॅझेटियर असेल तर एकदम सोपा विषय आहे. पश्चिम महाराष्ट्रात पुरा बसतो. हैदराबादचं गॅझेटियर सांगतं की, मराठवाड्याचा मराठा हा कुणबी आहे. म्हणून त्यांना द्यायची काही गरज नाहीय. त्यांनी शिंदे समितीने सरकारला अहवाल देणं गरजेचं आहे. सरकारने राज्य मागास आयोगाकडून तो अहवाल जाणं गरजेचं आहे. त्यानंतर ते आरक्षण द्या. ते टिकवायचं आणि अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आहे. दीडशे वर्षांपूर्वीच्या नोंदी आहेत, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## दोन्ही नेत्यांकडून परस्परांचा विकास, व्यापारातील समतोल, दहशतवादाविरुद्ध लढ्यावर एकमत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनमधील तियानजिन येथे शांघाय सहयोग संघटनेच्या शिखर संमेलनात भाग घेतला, त्यावेळी त्यांची चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी भेट झाली. एका वर्षापेक्षा कमी कालावधीत या दोन नेत्यांची ही दुसरी भेट होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यातील बैठकीत अनेक महत्वाच्या विषयांवर चर्चा झाली.

भारताचे विदेश सचिव विक्रम मिसरी यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आज सकाळच्या पहिल्या महत्वाच्या भेटीत चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांच्याशी चर्चा झाली. गेल्या वर्षी ऑक्टोबर २०२४ मध्ये कझान येथे झालेल्या भेटीत दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांच्या विकासासाठी काही धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली होती, तसेच दोन्ही बाजूंसाठी काही ठोस उद्दिष्ट्ये निश्चित केली होती, असेही मिसरी यांनी सांगितले.



जिनपिंग यांच्याबरोबर झालेल्या चर्चेदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी सीमपलीकडच्या दहशतवादाचा उल्लेख केला. बैठकीत दोन्ही नेत्यांनी या गोष्टीवर जोर दिला की, भारत आणि चीन हे आपापल्या देशांतर्गत विकासावर लक्ष केंद्रित करत आहेत आणि या प्रक्रियेत त्यांनी प्रतिस्पर्धी नव्हे तर भागीदार बनले पाहिजे. मतभेद विवादात बदलू नयेत आणि स्थिर तसेच मैत्रीपूर्ण संबंध दोन्ही देशांतील २.८ अब्ज लोकांसाठी फायदेशीर ठरतील, यावर दोघांनीही सहमती दर्शवली.

राष्ट्रपती शी जिनपिंग यांनी सहकार्य मजबूत करण्यासाठी काही महत्वाचे मुद्दे मांडले, ज्यावर पंतप्रधान मोदी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. सीमावर्ती भागांमध्ये शांतता आणि स्थिरता द्विपक्षीय संबंधांच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केले. दोन्ही नेत्यांनी परस्परांचा विकास, व्यापारातील समतोल, दहशतवादाविरुद्ध लढा आणि लोकांमध्ये संपर्क वाढवणे यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा केली. भारत आणि चीनने एकत्रितपणे बहुध्रुवीय आशियाच्या निर्मितीच्या दिशेने काम केले पाहिजे, यावरही एकमत झाले.

आर्थिक आणि व्यापारी संबंधांवर जोर देताना, पंतप्रधान मोदी आणि जिनपिंग यांच्या बैठकीत भारतीय आणि चीनी अर्थव्यवस्था जागतिक व्यापाराला स्थिरता प्रदान करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, यावर सहमती झाली.

द्विपक्षीय व्यापार तूट कमी करण्यासाठी, आपापसातील व्यापार आणि गुंतवणूक दोन्ही दिशांना सुलभ करण्यासाठी, धोरणात्मक पारदर्शकता आणि अनुमानक्षमता वाढवण्यासाठी राजकीय आणि सामरिक दृष्टिकोन महत्त्वाचा आहे, यावर दोन्ही नेत्यांनी जोर दिला.

पत्रकार परिषदेत बोलताना विक्रम मिसरी म्हणाले की, पंतप्रधान मोदी आणि जिनपिंग यांच्या बैठकीत जागतिक समस्यांवरही चर्चा झाली. पंतप्रधान मोदींनी राष्ट्रपती शी जिनपिंग यांना २०२६ मध्ये भारतात होणाऱ्या ब्रिक्स शिखर संमेलनासाठी आमंत्रित केले, असेही त्यांनी सांगितले.

### गावाच्या समृद्धीसाठी जिल्ह्यातील सर्व सरपंचांनी या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावाच

### सलग पाच वर्ष ग्रामपंचायत कर थकविणाऱ्यांना निवडणूक लढण्यास निर्बंध आणू

## मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानात एकरकमी थकीत कर भरल्यास ५० टक्के माफी : पालकमंत्री जयकुमार गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : गावे समृध्द करण्यासाठी आणि गावातील लोकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी तसेच शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजना गावात प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या वतीने आता 'मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानात सहभागी गावातील लोकांनी ग्रामपंचायतीचा थकीत कर एकरकमी भरल्यास त्यांना थेट ५० टक्के सवलत देण्याची ग्वाही राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.





ग्रामविकास विभागाच्या वतीने संपूर्ण राज्यात मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान राबविण्यात येणार असून, त्यासाठी रविवारी हुतात्मा स्मृती मंदिरात आयोजित कार्यशाळेत ना. जयकुमार गोरे बोलत होते. यावेळी यशदाचे उप महासंचालक मल्लिनाथ कलशेट्टी, आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचे प्रकल्प संचालक अमोल जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, शिक्षणाधिकारी सचिन जगताप, शिक्षणाधिकारी कादर शेख, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, समाज कल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे, पुणे जिल्हा परिषदेचे कृषीचे माजी सभापती शरद गुट्टे आदी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री श्री. गोरे म्हणाले, सातत्याने कर थकविणाऱ्या आणि निवडणुका आल्यावरच कर भरणाऱ्यांवर आता शासन लक्ष ठेवून आहे. त्यामुळे सलग पाच वर्ष ग्रामपंचायतीचा कर थकविणाऱ्यावर निवडणूक लढविण्यासाठी निर्बंध घालण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला. तेच हे अभियान राजकारण विरहित करुन गावाला विकासाच्या मुद्द्यावर एकत्र आणण्याचा प्रयत्न करावा. तसेच यामध्ये बक्षीस योजना ठेवण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे यंत्रणेत काम करणाऱ्या सर्व अधिकारी आणि राजकीय मंडळींनी यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

**मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान कार्यशाळा; जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचा आषाढी यात्रेतील उत्कृष्ठ कामा बद्दल पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान**

या अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा नवा अध्याय लिहिण्यासाठी सर्वांनी सज्ज रहा. पहिल्या टप्प्यात या अभियानात राज्यातील जवळपास ६ हजार ५०० गावे सहभागी होतील. त्यामध्ये जवळपास १९२० गावांना बक्षीस मिळविण्याची संधी आहे. केवळ बक्षिसासाठी ही योजना नाही, तर गावे समृध्द करण्याचे अभियान असल्याचे ना. गोरे यांनी सांगितले. त्यामुळे अधिकारी कर्मचारी, आमदार, खासदार, सरपंच आणि गावगाड्यातील प्रत्येकाने यामध्ये हिरीरीने भाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

विजेत्याचा पंतप्रधानांच्या हस्ते गौरव

या अभियानामध्ये सहभागी होणाऱ्या ग्रामपंचायतीला कोट्यवधीची बक्षिसे मिळणार (पान २ वर...)

## संपादकीय....

### कायद्याच्या चौकटीतच निर्णय

मराठा आरक्षणासाठी तीन दिवसांपासून आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तोडगा काढण्यासाठी राज्य सरकारने पर्यायांची चाचपणी सुरू केली आहे. मंत्रिमंडळ उपसमितीने रविवारी दोन वेळा बैठका घेऊन विविध मुद्द्यांवर मंथन केले. मात्र, त्यातून कोणताही तोडगा निघू शकला नाही; परंतु, 'तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू असून, कायदा, राज्यघटनेच्या चौकटीतच निर्णय घेण्यात येईल,' असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी स्पष्ट केले. आझाद मैदान आणि परिसरात रविवारी सलग तिसऱ्या दिवशी आंदोलकांनी शक्तिप्रदर्शन करून आरक्षणाची मागणी जोरकसपणे मांडली. या पार्श्वभूमीवर शासकीय पातळीवर बैठकांचे सत्र सुरू आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या मुद्द्यावर सरकारची भूमिका मांडली. 'या संदर्भात कायद्याच्या चौकटीतच निर्णय घ्यावा लागणार आहे. न्यायालयाच्या आधीच्या निर्णयांचाही विचार करावा लागेल. कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन असेच निर्णय घ्या, असे कोणी म्हणत असेल आणि सरकारने त्यांना खूश करण्यासाठी असा निर्णय घेतला तर तो एक दिवसही टिकणार नाही. त्यानंतर मराठा समाजाची फसवणूक झाल्याची भावना तयार होईल. त्यामुळे आम्ही चर्चा करीत आहोत. मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीत विचार-विनिमय सुरू आहे. कायदेशीर सल्लागारांचे मत घेत आहेत. त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करू. लोकशाहीत चर्चेतून तोडगा निघतो. आडमुठ्या भूमिकेने तोडगा निघत नाही. 'माजी न्यायमूर्ती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती आपण तयार केली. त्या समितीमुळेच बऱ्याच नोंदी सापडल्या. अनेकांना प्रमाणपत्रेही मिळाली. शिंदे समितीनेच जरांगे यांना भेटून या बदलासाठी वेळ लागणार असल्याचे सांगितले. पण, आताच द्या, असे त्यांचे म्हणणे आहे. शेवटी चर्चेतून मार्ग काढता येतो. मला कायद्यानुसारच निर्णय घ्यावे लागतात. मी घटनेच्या चौकटीबाहेर जाऊ शकत नाही,' असेही ते म्हणाले.

# ३१ ऑगस्ट – भटके विमुक्त दिवसः गौरव, वास्तविकता आणि सामाजिक पूर्वग्रह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारताच्या सामाजिक इतिहासात भटक्या विमुक्त समाजाचा अनुभव अत्यंत संघर्षमय राहिला आहे. ब्रिटिश राज्यकाळात १८७१ मध्ये लागू केलेल्या उीळाळपरश्र ढीळलशी लीं अंतर्गत काही स्थलांतरित, भटक्या आणि विशिष्ट समुदायांना जन्मजात गुन्हेगार जमाती म्हणून घोषित केले गेले. या कायद्यामुळे त्या समाजाला शिक्षण, रोजगार, सामाजिक सहभाग आणि आर्थिक संधी मिळाल्या नाहीत, तसेच समाजातून बहिष्कार आणि नकारात्मक पूर्वग्रह कायम झाले.

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने १९४९ मध्ये हा कायदा रद्द केला आणि अनेक लोक डिनोटिफाइड झाले. तथापि, १९५२ मध्ये लागू झालेल्या क्र–लळीींरश्र जषषशपवशीी लीं ने पूर्वीचा कलंक काही प्रमाणात कायम ठेवला. यामुळे समाजातील अनेक भटके विमुक्त समुदाय अजूनही सामाजिक पूर्वग्रहांच्या फासात अडकलेले आहेत, ज्यामुळे त्यांच्या विकासाचा मार्ग मर्यादित राहिला.

आजही भटके विमुक्त समाज अनेक अडचणींशी झुंज देतो. अनेक लोक त्यांना संदिग्ध किंवा गुन्हेगार मानतात, ज्यामुळे समाजात पूर्वग्रह निर्माण होतो. हे पूर्वग्रह केवळ समाजातच नाही, तर प्रशासन, पोलीस आणि माध्यमांमध्येही दिसतात. परिणामी, भटके विमुक्त समाजाला सरकारी योजनांचा पूर्ण लाभ मिळत नाही, रोजगार आणि आर्थिक संधी मर्यादित आहेत, उच्च शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या संधी अजूनही कमी आहेत. आरोग्य सुविधा, जीवनमान सुधारणा आणि सामाजिक सुरक्षा यामध्ये पुरेशी सुधारणा झालेली नाही.

महाराष्ट्र शासनाने भटके विमुक्त दिवसाच्या निमित्ताने काही शैक्षणिक, सांस्कृतिक आणि जागरूकता कार्यक्रम आयोजित केले आहेत. तथापि, आज राज्यभरात कोणत्याही ठोस कार्यक्रमाची माहिती उपलब्ध नाही. माध्यमांमध्ये काही लेख शासनाच्या यशाचे प्रदर्शन करतात, परंतु प्रत्यक्ष जीवनात भटके विमुक्त समाज अजूनही अनेक समस्या झेलतो. त्यामुळे हा दिवस केवळ उत्सवाचा नाही, तर सत्य मूल्यमापनाचा आणि सुधारणा करण्याचा दिवस आहे.

भटके विमुक्त समाजाचा गौरव करणे महत्त्वाचे आहे, परंतु त्यांच्या प्रत्यक्ष जीवनमानात सुधारणा ही खरी उद्दिष्टे असावी. समाजातील पूर्वग्रह हे त्यांच्या विकासातील प्रमुख अडथळे आहेत. त्यांच्या जीवनात स्थिरता, सुरक्षा आणि पूर्ण स्वातंत्र्य आणणे अत्यावश्यक आहे. ३१ ऑगस्ट हा दिवस फक्त उत्सवाचा दिवस नसून सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याचा दिवस ठरावा अशी अपेक्षा आहे.

इतिहास सांगतो की स्वातंत्र्यापूर्वी भटके विमुक्त समाजाला अन्याय आणि अत्याचार सहन करावा लागला, ज्यामुळे त्यांच्या जीवनात आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक दुर्बलता निर्माण झाली. स्वातंत्र्यानंतर काही सुधारणा झाल्या, जसे की डिनोटिफिकेशन, आरक्षण योजना, कौशल्य विकास शिबिरे, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रम, परंतु सामाजिक पूर्वग्रह कायम राहिला. यामुळे भटके विमुक्त समाज आजही पूर्वग्रह, भेदभाव आणि अपमान झेलतो.

विशेष तज्ज्ञांचे मत आहे की भटके विमुक्त समाजाच्या विकासासाठी फक्त औपचारिक कार्यक्रम पुरेसे नाहीत. प्रशासनाने पूर्वग्रह कमी करणे, समाजातील सहभागातून धोरणे राबविणे, सामाजिक समावेशन सुनिश्चित करणे आणि आर्थिक व शैक्षणिक सुधारणांवर भर देणे आवश्यक आहे. शैक्षणिक क्षेत्रात प्रवेश सोपा करणे, कौशल्य विकासावर भर देणे, रोजगार संधी वाढविणे आणि आरोग्य, सामाजिक सुरक्षा व आर्थिक स्थिरतेसाठी उपाययोजना ही प्राथमिक गरज आहे.

मीडिया आणि साहित्यिकांनी भटके विमुक्त समाजाच्या इतिहासाचे आणि योगदानाचे प्रदर्शन केले आहे, परंतु प्रत्यक्ष सुधारणा फारसा परिणाम करत नाही. सामाजिक पूर्वग्रह आणि चुकीच्या विश्वासांमुळे भटके विमुक्त समाजाला संधी मिळत नाहीत. त्यामुळे सत्य स्थितीचे मूल्यांकन आणि सातत्यपूर्ण सुधारणा ही खरी गरज आहे.

भटके विमुक्त समाजाचे पारंपरिक व्यवसाय, कला, संगीत आणि सांस्कृतिक परंपरा टिकवणेही महत्त्वाचे आहे. यासाठी सरकारी योजना, स्थानिक समाजाची मदत आणि शिक्षणातून जागरूकता वाढविणे आवश्यक आहे. ३१ ऑगस्ट हा दिवस फक्त गौरवाचा नाही तर समाजातील पूर्वग्रह कमी करण्याचा, भटके विमुक्त समाजाला वास्तविक समान संधी देण्याचा दिवस आहे.

आजच्या घडीला भटके विमुक्त समाजाला शिक्षण, रोजगार, सामाजिक समावेशन, आरोग्य, आर्थिक सुरक्षा आणि सांस्कृतिक जतन या सर्व क्षेत्रात सुधारणा करण्याची गरज आहे. प्रशासनाने औपचारिक कार्यक्रम, जागरूकता मोहिम आणि शैक्षणिक संधी पुरविल्या आहेत, परंतु वास्तविक लाभ अजूनही मर्यादित आहे. त्यामुळे भटके विमुक्त समाजाचा सन्मान, त्यांच्या जीवनातील स्थिरता आणि पूर्ण मुक्ती ही खरी उद्दिष्टे ठरावीत.

यातून स्पष्ट होते की भटके विमुक्त दिवस हा केवळ उत्सवाचा दिवस नाही, तर इतिहासाची जाणीव, समाजातील पूर्वग्रहावर मात, प्रशासनाची जबाबदारी आणि समाजाच्या वास्तविक विकासाचा दिवस आहे. शासन, समाज आणि स्थानिक संस्था एकत्र येऊन भटके विमुक्त समाजाला समर्पित धोरणे राबवली पाहिजेत, ज्यामुळे त्यांच्या जीवनात स्थिरता, सुरक्षितता आणि सामाजिक समावेशन सुनिश्चित होईल.

**– डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय दापोली,**
**जिल्हा रत्नागिरी.**

# मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानात एकरकमी थकीत कर भरल्यास ५० टक्के माफी : पालकमंत्री जयकुमार गोरे

(पान १ वरून..)

आहेत. केवळ बक्षिसासाठी नाही तर गावच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणाऱ्या आणि विजेत्या ३ ग्राम पंचायतीचे सरपंचांचा थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सन्मान करु, असे आश्वासन राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले आहे.

ग्रामपंचायती सर्व योजनांची शंभर टक्के प्रभावी अंमलबजावणी करा. मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान यशस्वी करा असे आवाहन राज्याचे ग्रामविकास व पंचायराज मंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

माझी ग्रामपंचायत मजबूत करा. स्वच्छ असली पाहिजे. महिलांची शौचालयाची व्यवस्था पाहिजे. रंग पाहिजे. ज्या ग्रामपंचायतीस इमारत नाही एक दिवसात मंजूर करू. सर्वोत्तम अंगणवाडी असली पाहिजे. अंगणवाडी साठी लोकांना हात जोडा. नोकरदार गोळा करा. सामाजिक काम करणारे लोक गोळा करा. दानशूरांचा सन्मान करा. शाळा समृध्द असली पाहिजे. शाळेस वृक्षारोपण करा. चांगली स्मशानभुमी करा. रंगरंगोटी करा. रस्ते स्वच्छ करा. स्वच्छता मोहिम राबवा. सरपंचानो ही तुमची योजना आहे, तुम्ही प्रत्येकाने सक्रिय सहभाग घ्याच, असे भावनिक आवाहन ग्रामविकास मंत्री गोरे यांनी केले.

**प्रत्येक गावाला नोडल अधिकारी नेमू**

मुख्यमंत्री ग्रामसमृध्द पंचायतराज अभियानात सहभागी असलेल्या गावांमध्ये वेळेत कामे व्हावीत तसेच प्रशासकीय पातळीवर त्यांना अडचणी येऊ नयेत यासाठी प्रत्येक गावाला एक नोडल अधिकारी नेमण्यात येईल तसेच गावातील मूलभूत कामांसाठी आणि अभियानात उत्कृष्ट काम करीत असलेल्या गावांना आमदारांच्या शिफारसीशिवाय निधी देऊ, असे आश्वासनही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले आहे.

**आषाढी यात्रेतील कामाचे समाधान**

आषाढी यात्रा कालावधीत केलेल्या कामाचे समाधान आहे. टीम वर्क म्हणून काम केले. आषाढी यात्रेत जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद , सिईओ कुलदीप जंगम , अतिरिक्त सिईओ संदीप कोहिनकर यांनी चांगले काम केले. गटविकास अधिकारी सुशील संसारे पंढरपूर यांचा उल्लेख केला. स्वतः लहान वयात आठ तास रांगेत उभा राहून दर्शन घेतले होते. व्हीआयपी दर्शन बंद केले म्हणून चार तासात माझी वारकरी दर्शन घेऊ शकला. मी स्वतः मुखदर्शन घेतले. त्यानंतर उप मुख्य मंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील मुख दर्शन घेतले. आधी स्वतः केले मग इतरांना सांगितले. तीन तास हातात झाडू घेतला. ४२ ठिकांनी व्यापक स्वच्छता मोहिम राबविली. असेही ना. गोरे यांनी सांगितले.

आमदार सुभाष देशमुख यांनी मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाचे कौतुक करून यामुळे गावे समृद्द होणेस मदत होणार असल्याचे सांगून पाच पी संकल्पना समजावून सांगितली. या प्रसंगी आमदार समाधान आवताडे यांनी आपल्या गावातील सर्व कामांत सरपंचानी मनावर घेऊन करावीत. गावाची कायापालट करणारे हे अभियान मतदार संघात प्रभावीपणे राबविणार असल्याचे सांगितले. प्रास्तविक प्रभारी सिईओ संदिप कोहिनकर यांनी केले. सुत्रसंचालन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव व ऐश्वर्या हिब्बारे यांनी केले.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचा आषाढी यात्रेतील उत्कृष्ठ कामा बद्दल पालकमंत्री यांचे हस्ते सन्मान करणेत आला.

आभार उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांनी केले.या कार्यक्रमाला साठी प्रशासन अधिकारी झेड ए शेख, वैभव आहाळे, अमोल महिंद्रकर, गणेश हुच्चे , काटकर, यांचे सह सर्व ग्रामपंचायत टीम ने परिश्रम घेतले.

# एमआयटी जुनिअर कॉलेजच्या श्रद्धा महाडिक यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

वाखरी तालुका पंढरपूर येथील एम.आय.टी. ज्युनिअर कॉलेजची अकरावीची विद्यार्थिनी कुमारी श्रद्धा महाडिक हिने नुकत्याच पार पडलेल्या तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत १९ वर्षाखालील गटात यश मिळवून आपले नाव जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निश्चित केले आहे. या विजयाबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पंढरपूर तालुक्यात विश्वशांती गुरुकुल वाखरी येथे आयोजित करण्यात आलेल्या या बुद्धिबळ स्पर्धेत अनेक शाळा व महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत श्रद्धाने प्रतिस्पर्ध्यावर मात करत आणि विजेतेपद पटकावली तिचा हा विजय केवळ तिच्या वैयक्तिक कौशल्याचेच नाही तर तिच्या भिंतीचेच प्रतीक आहे.

श्रद्धाच्या या यशात तिचे सक्रिय शिक्षक प्रवीण मिसाळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले त्यांनी तिला बुद्धिबळाच्या बारकाव्याची प्रशिक्षण दिले तसेच मुख्याध्यापिका शिवानी बॅनर्जी आणि प्राचार्य डॉक्टर स्वप्निल शेठ यांनी श्रद्धाला प्रोत्साहन दिली आणि तिला स्पर्धेसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य पुरवले त्यांचे प्रोत्साहन यामुळेच ती हे यश मिळवू शकली. तालुक्यातील स्पर्धेत मिळवलेल्या या विजयामुळे रधाची आता जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा तिच्यासाठी एक मोठी संधी असून या स्पर्धेत ही ती चांगली कामगिरी करेल असा विश्वास कॉलेज प्रशासनाने व्यक्त केला आहे. व तिच्या या पुढील स्पर्धे साठी तिला शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# आरक्षणासाठी हालचाली वाढल्या, मराठा उपसमितीच्या दोन–दोन बैठका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठा मंत्रिमंडळ उपसमितीची महत्त्वाची बैठक नुकतीच पार पडली आहे. राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडली. या बैठकीला माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे हे ऑनलाईन उपस्थित होते. या बैठकीनंतर मराठा मंत्रिमंडळ उपसमितीचे प्रमुख मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी बैठकीत नेमकी काय चर्चा झाली? याबाबत राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. हैदराबाद आणि सातारा गॅझेटियर याबाबत अंमलबजावणी करुन कसं पुढे जाता येईल, याबाबत बैठकीत चर्चा झाली. गॅझेटियरच्या नोदींनुसार अंमलबजावणी करताना काही त्रुटी आणि कायदेशीर बाजू समोर येत आहेत. त्या सोडवण्यासाठी महाधिवक्ता बिरेंद्र सराफ आणि माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे सूचना करणार आहेत, अशी माहिती राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

गॅझेटियरमध्ये नमूद केलेल्या नोदींनुसार जात प्रमाणपत्र देण्याबाबत किंवा त्याची अंमलबजावणी करताना काही कायदेशीर अडचणी आहेत. त्यामुळे न्यायमूर्ती शिंदे यांनी यासाठी वेळ वाढवून देण्याची मागणी केली आहे.

कारण त्रुटी प्रचंड आहेत. त्याचप्रमाणे मराठवाडा सोडला, निजामशाही सोडली तर इतर ठिकाणी लोकांची नावानुसार माहिती आहे. त्यामुळे आता प्रत्येक नावाचं व्हेरिफिकेशन करावं लागेल. तरीसुद्धा जिल्हा, तालुका स्तरावर काम करता येईल का, याबाबत महाधिवक्तांकडून माहिती जाणून घेतली, अशी माहितीदेखील विखे पाटील यांनी दिली.

शेवटी कोणत्याही सरकारने निर्णय घेतल्याने तो न्यायालयात टिकला पाहिजे. कालही संदीप शिंदे मनोज जरांगे यांची भेट घेऊन आले. त्यांनी कायदेशीर बाबी सांगण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना निर्णय हवा आहे. आतापर्यंत सर्वोच्च न्यायालयाचे काही निकाल आहेत, असं विखे पाटील यांनी सांगितलं.

# विद्येच्या देवतेच्या साक्षीने, गणेश चतुर्थीच्या पूर्वसंध्येला दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचा प्रकाश!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
नाशिक/प्रतिनिधी :

जिथे कमी, तिथे आम्ही या ब्रीदवाक्यानुसार नमस्ते नाशिक फाउंडेशनतर्फे सप्रे वाडी, शिरसाटे (ता. इगतपुरी, जि. नाशिक) येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, जीवनावश्यक वस्तू व भेटवस्तूंचे वाटप करून गणेश चतुर्थी साजरी करण्यात आली.



फाउंडेशनच्या अध्यक्षा स्नेहल देव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात शालेय दप्तर, पेन्सिल, खोडरबर, रंगीत पेन्सिल, पाटी, शार्पनर, हायलाईटर आदी साहित्य देण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार थंड पाण्याच्या बाटल्या देऊन करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय टाटिया होते. यावेळी वनपाल राजेंद्र आहेर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी महावीर इंटरनॅशनलचे अनिल नाहर व दक्ष पोलीस टाईमचे विजय टाटिया यांचे सहकार्य लाभले.

यावेळी अध्यक्ष विजय टाटिया यांनी शाळेतील विद्यार्थ्यांचे कौतुक केले व नमस्ते नाशिक फाउंडेशन यांच्या कार्याचे कौतुक केले व संस्थेस पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले शाळेच्या वतीने आभार... शाळेचे सहाय्यक शिक्षक एल एम लोहारे, सोनाली ठाकरे प्रशिक्षणार्थी,तसेच मुख्याध्यापक आर जी शिंदे, यांनी नम्र आभार मानले.

कार्यक्रमास फुलचंद सप्रे शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच सुनीता दत्तू सदगीर यांची उपस्थिती लाभली.

स्नेहल देव यांनी सांगितले की, हा उपक्रम केवळ वस्तूंचे वाटप नाही, तर विद्यार्थ्यांच्या जीवनात आशेचा किरण पेरणारा आहे.

# एनपी प्रीकास्ट कंपाउंड वॉल्स कंपनी नागरिकांच्या सेवेत





## त्रिवेणी मुहूर्त साधत कोर्टी–पंढरपूर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत फाटे यांच्या नवीन व्यवसायाचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर शहरानजीक असलेल्या कोर्टी येथे गणेश चतुर्थी, गौरी आगमन व उमेश फाटे यांच्या वाढदिवसाचा त्रिवेणी मुहूर्त साधत फाटे यांच्या एनपी प्रीकास्ट कंपाउंड वॉल्स या नवीन व्यवसायाचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत मंगलमय वातावरणात संपन्न झाला.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष, उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी सर्वांच्या सहकार्याने हा व्यवसाय नक्कीच यशस्वीपणे पुढे जाईल याची खात्री असल्याचा विश्वास व्यक्त करत सोहळ्यासाठी उपस्थित राहून शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या नागरिकांचे आभार मानले.

या सोहळ्यासाठी एन.पी परिवार कोर्टी येथील सदस्य आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ड.पांडुरंग नाईकनवरे माजी उपसरपंच पटवर्धन कुरवली, शशिकांत बागल – माजी संचालक, विठ्ठल सहकारी साखर कारखाना,कल्याण कुसुमडे – प्रतिनिधी उपसरपंच, बोहाळी विठ्ठल अर्बनचे संचालक सर्वश्री गोरख बागल संजय पवार, अभिमान पवार, संजय बागल, अण्णासाहेब फाटे,जाकिर मुलाणी – जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी ओबीसी सेल,बाळासाहेब बागल सदस्य गादेगाव ग्रामपंचायत, शिवाजी रेडे – प्रगतशील बागायतदार, डॉ. माणिक मस्के, गणपत उपासे (माजी उपसरपंच, पटवर्धन कुरली) डॉ.रमेश फाटे, विशाल मोरे, समाधान बागल, समाधान कांबळे, गणेश बागल, संतोष पुणेकर, वल्लभ शिंदे, ऋषिकेश बागल, शुभम फाटे, शशांक फाटे, ओंकार कथले, दादा पवार, ज्योतीराम फाटे, आदमीले मॅडम उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जगाची दिशा पाहून शिक्षणासाठी डॉ. रोंगे सर जे कार्य करतील त्यास सदैव सहकार्य असेल : उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील

## स्वेरीमध्ये लॉ कॉलेज व भव्य क्रीडांगणाचे उदघाटन आणि मुलींच्या नूतन वसतीगृहाची पायाभरणी कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'आज जागतिक स्तरावर भारताला क्रीडा क्षेत्रात पदके मिळत आहेत ही बाब अभिमानास्पद आहे. एशियायी आणि राष्ट्रकुल स्पर्धेमध्ये भारताने पदके मिळविली असून आता ऑलम्पिक स्पर्धेचे ध्येय आहे म्हणून जे ध्येय बाळगतात ते काहीतरी करायचे ठरवितात. पुढे ध्येयवेडी माणसं धाडसी बनतात. त्याप्रमाणे डॉ. रोंगे सरांनी धाडसाने स्वेरी या शिक्षणसंकुलाची उभारणी केली. जग हे ज्ञानावर आणि संशोधनाच्या जोरावर श्रीमंत झाले आहे. म्हणून जगाची दिशा पाहून शिक्षणासाठी डॉ. रोंगे सर जे कार्य करतील त्यास सदैव सहकार्य असेल' असे आश्वासन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.





'स्वेरीमध्ये स्वेरीज् लॉ कॉलेज पंढरपूर,नवीन बहुउद्देशीय इमारत व विद्युत प्रकाशझोताच्या सुविधेने सुसज्ज भव्य क्रीडांगण यांचे उदघाटन आणि मुलींच्या ९ मजली नूतन वसतीगृह क्र. ४ च्या पायाभरणी सोहळ्या' च्या निमित्ताने राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री तसेच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. जयकुमार गोरे हे होते. प्रास्ताविकात स्वेरीचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी स्वेरीच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतची वाटचाल, एकाची पाच महाविद्यालये, तसेच स्वाईप व एसव्हीआयटी अशा आणखी दोन संस्थांची वाटचाल, मिळालेली मानांकने, निधी याबाबत सविस्तर माहिती दिली. अध्यक्षस्थानावरून बोलताना पालकमंत्री ना. गोरे म्हणाले की, 'डॉ. रोंगे सर, तुम्ही असेच सर्वोत्तम शिक्षण देण्याच्या प्रयत्नात सातत्य ठेवा कारण प्रगतशील महाराष्ट्र घडविण्यासाठीमुख्यमंत्री फडणवीस हे संस्थेच्या पाठीशी राहतील. त्यावेळी मी संस्था व विद्यार्थी हितासाठी सहकार्याची भूमिका बजावेन. शिक्षणात अडचणी येवू नयेत यासाठी या जिजाऊच्या लेकींसाठी भविष्यात विविध योजना आणल्या जातील. यामुळे मुलींना समाजात मानाचे स्थान मिळावे यासाठी सरकारचे प्रयत्न राहतील. मुलींना प्राधान्य देणाऱ्या स्वेरीच्या वाटचालीचे कौतुक वाटते.' अशा शब्दात गौरव केला. यावेळी स्वेरी कॅम्पसमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत होते. याप्रसंगी पीएच.डी. प्राप्त केल्याबद्धल संस्थेचे सचिव डॉ. सुरज रोंगे यांचा ना. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तसेच संस्थेचे संस्थापक सचिव म्हणून केलेल्या कार्याबद्दल डॉ. बी. पी. रोंगे सरांचा देखील सन्मान झाला. यावेळी पंढरपूर- मंगळवेढा मतदार संघाचे आमदार समाधानदादा आवताडे, माढा मतदार संघाचे आमदार अभिजीतआबा पाटील, सांगोला मतदार संघाचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, विधान परीषदेचे माजी आमदारप्रशांत परिचारक, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, चेतन सिंह केदार, राष्ट्रवादी (शरद पवार गट) चे जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, गोपाळपूरच्या सरपंच सौ. पुष्पा बनसोडे,विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन व स्वेरीच्या विश्वस्त सौ. प्रेमलता रोंगे,पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. विकास भोसले व त्यांचे पदाधिकारी, पोलीस उपअधिक्षक आयपीएस प्रशांत डगळे, प्रा. सुभाष मस्के, स्वेरीचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव प्रा. डॉ. सुरज रोंगे, माजी अध्यक्ष व विश्वस्त व्ही. एस. शेलार, एन.एस. कागदे, धनंजय सालविठ्ठल, दादासाहेब रोंगे, विश्वस्त एच.एम.बागल, बी.डी.रोंगे, विश्वस्त एन. एम. पाटील, इतर विश्वस्त, कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम. एम. पवार, अन्य महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, व विद्यार्थीआदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. यशपाल खेडकर यांनी केले तर आभार संस्थापक व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी मानले.

# सैनिक टाकळीच्या कन्या नीलम सिद्धू पाटील या सेट परीक्षा उत्तीर्ण

सैनिक टाकळी/संजय चव्हाण : सैनिक टाकळी ता . शिरोळ. च्या कन्या सौ .नीलम सिद्धू पाटील या महाराष्ट्र शासनाद्वारे घेतलेल्या सेट (स्टेट इलिजिबिलिटी टेस्ट) परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या आहेत.




त्या सैनिक टाकळीतील डॉक्टर सिद्धू पाटील यांच्या कन्या आहेत.

त्यांचे शिक्षण चील ल.शव असून त्या मागच्याच वर्षी महाराष्ट्र शासनाच्या टेट परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर ताराराणी विद्यापीठ संचलित ,उषाराजे गर्ल्स हायस्कूल, कोल्हापूर या ठिकाणी कायमस्वरूपी माध्यमिक शिक्षिका या पदावर कार्यरत आहेत.

त्यांना अध्यापनाचा यापूर्वीचा १४ वर्षाचा अनुभव आहे.

शालेय जीवनापासूनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात वेगवेगळे विक्रम प्रस्थापित केले आहेत. त्यांचे उच्च शिक्षण विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथून झाले आहे, एम. एस. सी मध्ये असताना शिवाजी विद्यापीठामध्ये इनऑरगॅनिक केमिस्ट्री मध्ये त्यां विद्यापीठांमध्ये प्रथम क्रमांक मिळवून गोल्ड मेडलिस्ट होत्या. त्याबद्दल त्यांचा महाराष्ट्राच्या माजी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला होता.

सौ. नीलम सिद्धू पाटील यांच्या या यशानंतर त्यांचे सैनिक टाकळी व परिसरामध्ये मोठे कौतुक होत आहे. त्यांच्या या यशामध्ये त्यांचे पती, सासू-सासरे व आई वडील यांचे मोलाचे योगदान लाभले आहे.

# पंढरपूर तालुका पोलिसांची कारवाई; ८ वाळू तस्करावर तडीपाराची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातून आठ वाळू माफिया तडीपार करण्यात आले आहेत. पंढरपूर तालुका पोलिसांनी ही धडक कारवाई केली आहे व या कारवाईमुळे वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत. चंद्रभागा नदीतून मोठ्या प्रमाणात भिकारी श्रित्या वाळूची तस्करी केली जाते. या विरोधात सोलापूर जिल्ह्याची पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टीवाय मुजावर यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ अनुसार खालील नमूद वाळू माफियांना सोलापूर ग्रामीण सोलापूर शहर संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातून एका वर्षाकरिता तडीपार करण्याचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी यांच्याकडे सादर केला होता. त्या प्रस्तावास जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी मंजुरी दिल्यानंतर आठ वाळू तस्करांना एक वर्षासाठी तडीपार करण्यात आले आहे.

१) पंकज पांडुरंग कोळेकर (वय ३३ वर्ष) २) हिम्मत अनिल कोळेकर (वय तीस वर्ष) ३) विनोद अर्जुन कोळेकर (वय ३५ वर्ष) ४) संतोष दगडू चव्हाण (वय ४६ वर्षे) राहणार कोळेकर वस्ती गुरसाळी तालुका पंढरपूर) ५) आकाश उर्फ अक्षय भगवान घाडगे (वय २८ वर्ष) (राहणार देगाव तालुका पंढरपूर) ६) धनाजी रामचंद्र शिरतोंडे (वय ३४ वर्ष राहणार गुरसाळे तालुका पंढरपूर) ७) महेश दिगंबर शिंदे (वय २८ वर्षे सह्याद्री नगर इसवी तालुका पंढरपूर) ८) सोमनाथ अरुण लोंढे (वय ३४ वर्ष राहणार कवठळी तालुका पंढरपूर) असे एकूण आठ वाळूमाफियाना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे सोलापूर शहर व ग्रामीण जिल्ह्यातून एक वर्षाकरिता तडीपार करण्यात आलेली आहे. यांच्याविरुद्ध वाळू चोरीचे अनेक गुन्हे वेगवेगळे पोलीस स्टेशनला दाखल होत त्या अनुषंगाने वरील आठ व्यक्तींना पंढरपूर तालुका पोलिसांनी ३१ ऑगस्ट रोजी ताब्यात घेऊन त्यांची सोलापूर जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यामध्ये त्यामध्ये पुणे , या जिल्ह्यात तेथील वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये सोडून तडीपाडीच्या अंमलबजावणी केलेली आहे सदर तडीपार केलेल्या आठ जनाविरुद्ध वेगवेगळ्या पोलीस स्टेशनला मारामारीचे वाळू चोरीचे सरकारी कामात अडथळा आणल्याचे धमकी दिल्याची गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पूर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले ,पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय तोंडले, सहाय्यक उपनिरीक्षक विजू गायकवाड ,सहाय्यक उपनिरीक्षक आबा शेंडगे , पोलीस हेड कॉन्स्टेबल घंटी ,पोलीस हेडकॉन्स्टेबल सय्यद, पोलीस हेड कॉन्स्टेबल सागर गवळी, पोलीस हवालदार मंगेश रोकडे, पोलीस कॉन्स्टेबल बालाजी कदम, चालक पोलीस कॉन्स्टेबल हसन नदाफ, घाडगे, चाटे यांच्या पथकाने सदरची कारवाई केली आहे.

# उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक, मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, ह .भ .प.ज्ञानेश्वर जळगावकर, ह. भ. प प्रकाश जवंजाळ, प्र व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.





# दक्षता, दुर्वेश प्लॉव्हर्स सेंटर व्यवसायिक सिद्धी ओमले यांच्या वतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांचा मार्गदर्शन व गुणगौरव सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज :दक्षता, दुर्वेश प्लॉव्हर्स सेंटर व्यवसायिक सौ.सिद्धी सचिन ओमले यांच्या वतीने बेलघर /तळघर ग्रामस्थ, मुंबईकर, महिला मंडळ, तरुण वर्ग, के.सी.सी बॉईज क्रिकेट संघ यांच्या उपस्थितीत इयत्ता पहिली ते ग्रॅज्युएशन मध्ये उत्तीर्ण झालेल्या विध्यार्थ्यांचा शिक्षण, रोजगार, व्यवसाय मार्गदर्शन व गुणगौरव सोहळा तळा तालूका, बेलघर/तळघर येथे शुक्रवार (ता.२९) रोजी ठिक दुपारी २ वाजता अतिशय सुनियोजित वेळेत यशोचित पार पडला.या कार्यक्रमास गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली असून मुख्य मार्गदर्शक म्हणून महेश अंबावले सर यांचे मार्गदर्शन होते.तसेच या कार्यक्रमासाठी बेलघर/तळघर गावातील प्रमुख पाहुणे म्हणून कार्यकारणी पदाधिकारी मंडळी,पोलीस पाटील,विध्यार्थी वर्ग,ग्रुप ग्राम पंचायत चरईखुर्द ग्रामसेवक,सरपंच, सदस्य, सदस्या,के.सी.सी बॉईज क्रिकेट संघ कर्णधार/ उपकर्णधार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**तहसील कार्यालय पंढरपूर चा उपक्रम; शासनाच्या विविध योजनांचा लाभ पोहचवू : प्रांताधिकारी सचिन इथापे**

# भटक्या जमाती व विमुक्त जाती लाभार्थी विद्यार्थ्यांना १३७ प्रमाणपत्रांचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : तहसील कार्यालय पंढरपूर तालुका प्रशासनातर्फे विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील लाभार्थ्यांना ओळखपत्रे प्रमाणपत्र व विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी, शेतकी भवन, पंचायत समिती येथे कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात जातीचे दाखले, रहिवासी प्रमाणपत्र, उत्पनाचा दाखला, रेशन कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्र असे एकूण १३७ प्रमाणपत्र प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसिलदार सचिन लंगुटे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, निवासी नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड आणि निवडणूक तसेच महसूल नायब तहसीलदार व्ही. व्ही. बुचके साहेब यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

प्रांताधिकारी सचिन इथापे म्हणाले की, राज्य शासनामार्फत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याणासाठी विविध योजना लागू करण्यात आल्या आहेत. भटक्या जमाती म्हणजे अशा समाज घटकांचा समूह की जे पारंपारिक पद्धतीने एकाच ठिकाणी न राहता त्या स्वरूपात आपला उदरनिर्वाह करत असतात. महाराष्ट्र राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गांची संख्या लक्षणीय आहे. त्यांच्या जीवनशैलीमुळे शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. त्यासाठी अशा कार्यक्रमांच्या आयोजन करणे आवश्यक असल्याचे प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी भटक्या व विमुक्त समाजातील कोर्टी गावचे सरपंच राजू पवार, सामाजिक कार्यकर्ते लखन चौगुले, कैकाडी समाजाचे नितीन यादव, सामाजिक कार्यकर्ते रामा चौगुले, दादा पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून भटक्या व विमुक्त जातीतील नागरिक उपस्थित होत.

यावेळी जातीचा दाखला प्रमाणपत्र -१९, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र -७, रहिवासी प्रमाणपत्र -२१, उत्पन्नाचा दाखला -३६, रेशन कार्ड -२७, संजय गांधी व श्रावण बाळ मंजूर लाभार्थी-१०, आयुष्यमान भारत कार्ड-१५, दिव्यांग प्रमाणपत्र २ असे एकूण १३७ प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

# सौरभ भस्मे इंग्रजी विषयातील सेट परीक्षा उत्तीर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी विद्यालयातील राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक सौरभ भस्मे हे इंग्रजी विषयातील राज्यस्तरीय पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.



भस्मे हे अभ्यासू शिक्षक असून ते राज्यशास्त्र विषयातील सेट परीक्षा सुद्धा उत्तीर्ण आहेत.

त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, जूनियर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी याने अभिनंदन केले.

# हिंदवी स्वराज्याच्या उभारणीत भटके विमुक्त समाजाचेही योगदान : पालकमंत्री जयकुमार गोरे

## सोलापूर जिल्हा ३१ ऑगस्ट हा भटके विमुक्त दिवस म्हणून साजरा करणारा पहिलाच जिल्हा ठरला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मागील वर्षभरात सोलापूर जिल्ह्यातील भटके विमुक्त जातीतील नागरिकांना विविध शासकीय प्रमाणपत्रे उपलब्ध करून दिल्याबद्दल कौतुक करण्यात आले**

सोलापूर (जिमाका) : छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्य निर्माण केले. हे स्वराज्य निर्माण करत असताना महाराजांनी भटके विमुक्त जातीतील नागरिकांना सामावून घेतले होते. स्वराज्यातील गड-किल्ल्यांचे संरक्षण करणे, हेरगिरी खात्याचे प्रमुख म्हणून बहर्जी नाईक यांची कामगिरी तसेच महाराजांनी या समाजातील अनेक नागरिकांना सन्मानाचे स्थान दिलेले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या उभारणीत भटक्या विमुक्ताचेही योगदान होते, असे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय, इतर मागास बहुजन विभाग व भटके विमुक्त विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित भटके विमुक्त दिवसानिमित्तच्या कार्यक्रमात पालकमंत्री श्री. गोरे बोलत होते. यावेळी आमदार राजू खरे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस शहर उपायुक्त विजय कबाडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, राज्य भटके विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष उद्धव काळे, पश्चिम महाराष्ट्र चे अध्यक्ष संतोष शिर्के, इतर मागास बहुजन विभागाचे सहाय्यक संचालक गणेश सोनटक्के यांच्यासह भटके विमुक्त समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मागील वर्षभरात भटके विमुक्त साठी प्रशासनाने केलेले कार्य–

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने २५ शिबिरांद्वारे विमुक्त जाती व भटक्या जमाती मधील नागरिकांना १६०९ मतदान ओळखपत्रे, १४२१ जात प्रमाणपत्रे, ५१७ आधार कार्ड, १९ दिव्यांग प्रमाणपत्रे, तसेच ९१४ आयुष्यमान भारत कार्ड वितरित केली. विशेष म्हणजे, ६२ लाभार्थ्यांना घरकुलासाठी मोफत जमीन वाटप करण्यात आली, ज्यामुळे या समाजघटकांना स्थैर्य व सन्मान प्राप्त झाला. पालकमंत्री जयकुमार गोरे व भटके विमुक्त विकास परिषदेचे राज्य अध्यक्ष श्री. काळे यांनी सोलापूर जिल्हा प्रशासन तसेच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले.

पालकमंत्री श्री गोरे पुढे म्हणाले की सन १८७१ मध्ये ब्रिटिश सरकारने कायदा करून भटक्या विमुक्त समाजाला मुख्य प्रवाहापासून अलिप्त ठेवले होते. स्वातंत्र्यानंतर ३१ ऑगस्ट १९५२ रोजी तत्कालीन शासनाने हा कायदा रद्द केला व भटक्या विमुक्त समाज मुख्य प्रवाहात जोडण्याचे प्रयत्न सुरू झाले. राज्य शासन ही भटके विमुक्त समाजातील नागरिकांना सर्व प्रकारच्या शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी प्रयत्नशील आहे. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून भटके विमुक्त समाजातील बेघर नागरिकांना घरकुलांचा लाभ दिला जात आहे. तसेच या ज्या नागरिकांना स्वतःची जागा नाही, त्यांना जागाही मोफत उपलब्ध करून दिली जात आहे. शासन या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्य भटके विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष श्री. काळे म्हणाले की, भटके विमुक्त समाजाला इंग्रज सरकारने कशा पद्धतीने कायदा करून समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले. तसेच या समाजावर गुन्हेगारी प्रवृत्तीचे असल्याचा ठपका ठेवला, परंतु भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर ३१ ऑगस्ट १९५२ रोजी तत्कालीन शासनाने हा कायदा रद्द केला. त्यामुळे या समाजाला शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्याचा तसेच अन्य समाजासोबत जोडण्याचा लाभ झाला. परंतु आजही हा समाज शासनाच्या अनेक योजनापासून वंचित आहे. या समाजातील अनेक नागरिक जात प्रमाणपत्र, आधार कार्ड, मतदान कार्ड यापासून वंचित आहेत. तरी या समाजाच्या नागरिकांना सर्व शासकीय प्रमाणपत्र मिळण्यासाठी शासनाने वेळोवेळी शिबिरांचे आयोजन करून त्यांना प्रमाणपत्र उपलब्ध करून द्यावीत, असे त्यांनी सांगितले.




### भटके विमुक्त जातीतील नागरिकांना विविध प्रमाणपत्राचे वाटप

इतर मागास बहुजन विभागाचे सहाय्यक संचालक श्री सोनटक्के यांनी आपल्या प्रस्ताविकास सांगितले की, शासन भटके विमुक्त समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध प्रकारच्या योजना चा लाभ देत आहे. राज्य शासनाने ३१ ऑगस्ट रोजी भटके विमुक्त दिवस साजरा करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केलेला असून या अनुषंगाने या समाजातील नागरिकांमध्ये शासकीय योजना बाबत प्रबोधन केले जाणार आहे.

प्रारंभी पालकमंत्री जयकुमार गोरे व मान्यवर यांच्या हस्ते राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमा चे पूजन तसेच दीप प्रज्वलन करून भटके मुक्त दिवस ह्या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर पालकमंत्री महोदय यांच्या हस्ते भटके मुक्त समाजातील गुणवंत विद्यार्थी, राज्य शासनाच्या सेवेत नुकतेच निवड झालेले उमेदवार यांचा गौरव करण्यात आला. तसेच प्रातिनिधिक स्वरूपात भटके मुक्त समाजातील लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्र, रेशन कार्ड आदींचे वाटपही करण्यात आले. प्रारंभी नियोजन भवन परिसरात पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे भटके विमुक्त समाजातील नागरिकांनी पारंपारिक वाद्य वाजवून व नृत्य चे सादरीकरण करून स्वागत केले.या कार्यक्रमास भटके विमुक्त समाजातील शेकडो विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

---

# दरेगाव येथे आर्ट ऑफ लिव्हिंग आणि केंन्ट यांच्या संकल्पनेतून वॉटर फिल्टर्स व आंबा रोपटे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी



श्री श्री रविशंकर आर्ट ऑफ लिव्हिंग आणि केंन्ट यांच्या वतीने दि. ३१ ऑगस्ट रोजी आर्दश गाव गट ग्रामपंचायत दरेगाव नागझरी.दरेगाव तालुका सिंदखेडराजा जिल्हा बुलढाणा येथे.भगवानबाबा बहुद्देशीय संस्था हनवतखेड सिंदखेडराजा तालुका प्रकल्प कार्यान्वय यंत्रणा यांच्या वतीने.पाणी फिल्टर व आंबा झाड प्रती एक व्यक्ती ३०० रूपये वाटप कार्यक्रम आयोजित करून नागरिकांना वितरीत करण्यात आले.

ग्रामिण भागातील आरोग्य आणि स्वच्छता सुधारण्याच्या उद्देशाने आर्ट ऑफ लिव्हिंग आणि केंन्ट पाणी फिल्टर्स संपूर्ण भारतात उच्च दर्जाचे मोफत वितरीत करण्याच्या उद्देशाने एक संयुक्त उपक्रम मजबूत केला आहे.१०जुन २०२४ रोजी.दिल्ली येथे.सामजस्व करारावर स्वाक्षरी करण्यात आली स्वाक्षरी संदर्भात आर्ट ऑफ लिव्हिंग सोशल प्रोजेक्ट्सचे अध्यक्ष श्री प्रसंना प्रभु.आणी केंन्ट चे व्यवस्थापकीय संचालक श्री महेश गुप्ता यांच्या सह प्रमुख व्यक्ती उपस्थित होत्या.तर गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या दिव्य उपस्थितीने या प्रसंगाला प्रेरणा मिळाली .या उपक्रमासाठी भारतातील चार राज्यांमध्ये . वितरीत करण्याचे महत्वकांक्षी लक्ष ठेवले आहे. ज्याचा पहिला टप्पा महाराष्ट्रात २५००० फिल्टर्स वितरीत करण्याचे लक्ष केंद्रित केले आहे.आर्ट ऑफ लिव्हिंग हि एक ना नफा शैक्षणिक आणि मानवतावादी संस्था आहे जी १९८१ मध्ये जगप्रसिद्ध मानवतावादी आणि अध्यात्मिक गुरूदेव श्री श्री रविशंकर यांनी स्थापन केली होती ती संस्था जलसंवर्धन प्रकल्पाद्वारे देशाला पाणी टंचाई पासून मुक्त करण्यासाठी भारत सरकार सोबत जवळुन कामकरणे.व इतर उपक्रमांमध्ये श्वावत शेती.वणिकरण.मौफत शिक्षण कौशल्य.विकास महीला शक्षिमीकरण एकात्मिक ग्राम विकास करून उर्जा आणि कचरा आणि व्यवस्थापन यांचा सामावेश आहे.आर्ट ऑफ लिव्हिंग केंन्ट यांच्या वतीने वरील उपक्रम मोफत राबविले जातात.त्या अनुषंगाने. प्रकल्प कार्यान्वित यंत्रणा.भगवान बाबा बहुद्देशीय संस्था हनवतखेड द्वारा आर्दश गाव गट ग्रामपंचायत दरेगाव नागझरी.दरेगाव तालुका सिंदखेडराजा येथे पाणी फिल्टर्स व आंबा झाड वितरीत करण्यात आले. उपस्थित सरपंच सौ कोमलताई रवि मांन्टे. भगवान बाबा बहुद्देशीय संस्था हनवतखेड संस्थेचे अध्यक्ष संजय जायभाये.उपसरपंच प्रकाश काळे . सुरेश बंगाळे . नितीन साबळे . नितेश साबळे . रमेश चाटे माजी सरपंच भगवान सोनाजी बंगाळे शेषराव काळुसे.व समस्त गावकरी मंडळी उपस्थित होते.

---

# मुंबई नाशिक राष्ट्रीय महामार्गावर खड्ड्यांमुळे अपघाताची भिती





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील पडघा टोल नाका अंतर्गत असलेल्या मुंबई नाशिक राष्ट्रीय महामार्गावर असंख्य खड्डे पडल्याने अपघाताची भिती व्यक्त करण्यात येत आहे

ऐन गणेशोत्सवात राष्ट्रीय महामार्गावर खड्डयांचे विघ्न पसरल्याने वाहन चालकांच्यात संताप व्यक्त होत आहे. पडघा टोलनाका ते वासिंद दरम्यान टोलनाक्याजवळ, डोहळे, कोंशीबी, कासणे, कादंळी येथे महामार्गावर असंख्य खड्डे पडले असुन हे खड्डे पावसाच्या पाण्याने भरल्याने वाहन चालकांना वाहन चालवताना ऐन गणेशोत्सवात तारेवरची कसरत करावी लागत आहे तसेच. सदरचा रस्ता बिओटी तत्त्वावर एका कंपनीला दिला असुन सदर कंपनी दिवस रात्र पडघा टोल नाक्यावर टोल वसुली करत असुन महामार्गावरील खड्डे थातुर मातुर साहीत्य, खडी वापरून खड्डे भरण्याचे काम करते परंतु निकृष्ठ दर्जाच्या साहीत्यामुळे अल्पावधीतच खड्डयातील खडी बाहेर येऊन महामार्गावर खड्डयाशेजारी छोटे उंचवटे तयार झाले असुन वाहन कसे चालवायचे असा प्रश्न वाहनचालकांना पडला आहे तसेच रात्रीच्या वेळी अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही तर अनेक वेळा खड्डयात वाहने आदळून नादुरूस्त होत आहेत. त्यामुळे जेसीबीच्या सहाय्याने तयार झालेले उंचवटे काढुन टाकुन रस्ता दुरूस्त करण्याची मागणी वाहनचालकांनी केली आहे.

---

# महालक्ष्मी पूजनाचा खरा अर्थ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

ज्येष्ठा गौरी आव्हान हा गणपती मध्येच अतिशय धूम धडाक्यातसाजरा होणारा उत्सव आहे. या उत्सवामध्ये गौरी पूजा केली जाते. असे पाहिले तर स्कंदपुराण, व पद्मपुराण, मार्कंडेय पुराण, देवी भागवत या सर्वच ग्रंथांमध्ये देवींची उपासना सांगितलेली आहे. कधी तिला आदिशक्ती म्हटले आहे. कधी राक्षसाचा सहार करणारी म्हणून तिचे पूजन केलेले आहे. कधी राक्षसाचा सहार करणारी म्हणून तिचे पूजन केलेले आहे. तर कधी धन ,धान्य ऐश्वर्या, संपत्ती देणारी महालक्ष्मी पूजन केलेले आहे.

आपल्या सनातन धर्मामध्ये पुरुष देवता आणि स्त्रीदेवता असा काही भेदभाव नाही. पूर्वी साधारणतः शंकर विष्णू ,देवी, सूर्य, आणि गणपती या देवतांची सर्व पूजा केली जायची. वैष्णव हे विष्णूला प्रमुख देवता मानायचे आणि इतर सर्वांची ही पूजा करायचे. आणि इतर सर्वांची ही पूजा करायचे. त्याचप्रमाणे काही लोक देवीला प्रमुख देवता मानायचे, तर काही सूर्याला, तर काही गणपतीला. परंतु इतर सर्व देवतांची पूजा केली जायची.

श्रेष्ठ गौरी हे सुद्धा देवीचे स्वरूप आहे. देवीची ती पूजा आहे. धन, धान्य ,ऐश्वर्य, संपत्ती, देणारी महालक्ष्मी आहे. आपला समाज प्रामुख्याने गृहस्थाश्रमी समाज आहे. गृहस्थाश्रमी माणसाला नेहमीच त्याच्या परिवाराची व मुला बाळाच्या भविष्याची चिंता असते. त्यामुळे आज माझ्याजवळ ही सुख संपदा आहे ती भविष्यातही कायम राहील का नाही? ही चिंता नेहमी त्याला सतावत असते.

---

**विवेकानंद प्रतिष्ठान व्याख्यानमाला - पुष्प - ४**

**‘देवी’ या एकपात्री नाट्यप्रयोगाचे सादरीकरण**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावरील एक पात्री नाटकात अक्कलकोट वासीय एकरूप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावरील एक पात्री नाटकात अक्कलकोट वासीय एकरूप झाले. प्रियदर्शनी सांस्कृतिक भवन एकपात्री नाटक प्रयोग सादर प्रसंगी कमालीची शांतता व रसीक श्रोते प्रेक्षक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्राशी एक रूप झाले होते . एक पात्री जीवन चरित्र सादर करताना सुप्रसिद्ध अभिनेत्री रश्मी देव यांनी अथक नॉनस्टॉप मध्यंतर न घेता सर्व पात्रे उभी केली एकही प्रेक्षक नाट्य प्रयोगाचा काळ कसा संपला हे प्रेक्षकाना कळलेच नाही प्रेक्षक एकरूप झाले होते .

विवेकानंद प्रतिष्ठान अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या वतीने गणेशोत्सवा निमित्य आयोजित व्याख्यानमालेच्या तिसऱ्या पुष्पानिमित्त स्नेह पुणे निर्मित संस्कार भारती प्रस्तुत ’देवी’ या एकपात्री नाट्यप्रयोगाचे सादरीकरण करताना रश्मी देव बोलत होत्या.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित या प्रभावी नाट्याचे दिग्दर्शन प्रा.योगेश सोमण यांनी केले होते, तर सादरीकरण सुप्रसिद्ध अभिनेत्री रश्मी देव यांनी केले.

या एकल नाट्यातून अहिल्यादेवी होळकर यांचे अद्वितीय व्यक्तिमत्त्व, संकटांवर मात करून राज्यकारभार सांभाळण्याचे धैर्य, प्रजेसाठीचे त्यांचे ममत्व आणि अचूक न्यायदानाची परंपरा यांचा प्रभावी उलगडा झाला. बालपणीच्या घटना असोत वा आयुष्यातील दुःखांचे डोंगर या सर्व प्रसंगांना सामोरे जात त्यांनी प्रजेसाठी स्वतःला झोकून दिले. त्यांचे धार्मिक परंतु धर्मांध नसलेले व्यक्तिमत्व, प्रजावत्सलता आणि कर्मयोगी वृत्ती या नाट्यप्रयोगातून ठळकपणे अधोरेखित झाली.

नाटकात लेखकाने ‘कलाकार’ आणि ‘भूमिका’ अशी दोन प्रतीकात्मक पात्रे रेखाटली होती. कलाकार अहिल्यादेवींची भूमिका साकार करण्यास उत्सुक असते, पण तिला ती भूमिका कशी वठवायची हे समजत नसते. यावेळी ‘भूमिका’ म्हणजेच अहिल्यादेवी स्वतःच कलाकाराला मार्गदर्शन करण्यासाठी येतात आणि त्यांच्या दोघींमधील संवादातून ‘देवी’ हा नाट्यप्रयोग आकार घेतो. या प्रयोगामुळे प्रेक्षकांना आत्मविश्वास आणि प्रेरणा मिळाली. अहिल्यादेवींच्या जीवनचरित्रात असलेले सामर्थ्य, त्याग आणि कार्यकर्तृत्व याचा अनुभव प्रेक्षकांना प्रत्यक्ष मिळाला.



अहिल्याबाई होळकर या भारताच्या इतिहासातील एक थोर स्त्री शासक होत्या. त्यांचा जन्म १७२५ रोजी महाराष्ट्रातील चांदी गावात झाला. त्या लहानपणापासूनच बुद्धिमान, धर्मप्रेमी, मधूर होती जिची वाणी अशीजन्मली तत्त्वज्ञानी राणी, गाजवल्या जिने दिशा-दाही, तिच्या उत्तुंग कार्याला सीमा नाही. सुधान आनंदी आमची जनता. कारण उत्तम शासन, तत्वज्ञानाची राणी होती अहिल्या राजमाता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी व्याख्यानमालेतील या तिसऱ्या पुष्पाचे उद्घाटन संगीता पाटील, अमृता चिक्कळी, चंद्रकला मडचाणे, मिलन तोरस्कर व सुनीता घोडके यांच्या हस्ते झाले.

या एकल नाट्यप्रयोगाला अक्कलकोट शहरातील रसिक प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अहिल्यादेवींचे चरित्र म्हणजे प्रेरणादायी दीपस्तंभ असल्याचे या नाट्यप्रयोगातून अधोरेखित झाले.

याप्रसंगी प्रशांत शिंदे व्यंकट धर्मशाले मेजर नटटू शेख प्रताप भोसले अनिल तेलीशंकर व्हनमाने महेश कलशेट्टी सुनील गोरे दिनेश पटेल विलास कोरे मल्लिनाथ मसुती राजशेखर चनशेट्टी श्रीकांत झिपरे गुरूपाद आळगी ओमप्रकाश तळेकर चंद्रकांत दसले गजानन पाटील स्वामीराव घोडके संतोष घोडके अशोक कोरे शिवशरण जोजन शिवशरण वालेसह शेकडो महिला पुरुष श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्रसंचालन कल्पना स्वामी यांनी केले, तर कार्यक्रमाची ओळख निशिगंधा कोळी यांनी करून दिली. आभार प्रदर्शन बापूजी निंबाळकर यांनी केले.